# जय जय जय प्रथमेशा गणेशा

जय जय जय प्रथमेशा, गणेशा,
मंगलमय कर सारे जीवन,
शिवसुता तुज करितो वंदन
मंगलमय कर सारे जीवन,
शिवसुता तुज करितो वंदन
जय जय जय प्रथमेशा, गणेशा ॥ धृ ॥
उरी निराशा,खंत नसू दे,
सदा हर्ष, आनंद असू दे,
पावनतेचा गंध वसू दे,
रुजू दे, फुलू दे (2)
फुलू दे नव अभिलाषा, गणेशा,
जय जय जय प्रथमेशा, गणेशा ॥ 1 ॥
आकांक्षाला पंख फुटू दे,
प्रतिभेचे नव रंग चढू दे,
उल्हासाने जीवन भरू दे,
बहर नवा दे या उन्मेशा (2)
जय जय जय प्रथमेशा, गणेशा(2) ॥ 2 ॥
मंगलमय कर सारे जीवन,
शिवसुता तुज करितो वंदन
जय जय जय प्रथमेशा, गणेशा
जय जय जय प्रथमेशा, गणेशा, गणेशा, गणेशा...